जा. नं. ११६८ १९७३-७४ (5)

पुणे दिनांक - २५-५-१९७३

28 MAY 1973

Inward No. 16/73-74
Date 30/5/73

मा. व्यवस्थापक

कर्नाटक इंग्लीश मेडियम प्राथमिक शाळा,

५५ ब ५७ डॉ. केळकर रोड, येरंडवणा,

पुणे ४ यांस ....

संदर्भ - मा. शिक्षणमंडळ ठराव क्रमांक ५१ दि. २२-५-१९७३.

मा. शिक्षणमंडळ ठराव क्रमांक ५१ दिनांक २२-५-१९७३ ने कर्नाटक इंग्लीश मेडियम प्राथमिक शाळा, येरंडवणा, पुणे ४ या शाळेस फर्स्ट मान्यता देण्यात आली आहे. मा. स कळावे दि. २५-५-१९७३

[signature]

शिक्षणप्रमुख, शिक्षणमंडळ

पुणे महानगरपालिका.

30/5/73

जावक क्र. B/१०८० , दिनांक २१ । ५ । १९७६.

मा. शिक्षणप्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
शि. राजीनगर, पुणे ५,
यांजकडून

मा./श्री. मुख्याध्यापक,
कर्नाटक हायस्कूल,
५५-५७ डॉक्टर केतकर रोड.
एरंडवणा, पुणे-४. यांजकडे

विषय : इंग्रजी माध्यमाची इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी ची प्रत्येकी एक तुकडी वाढविण्यास परवानगी देणेबद्दल.

संदर्भ : आपले पत्र जा. क्र. २४० दिनांक - १७-५-७६.

उपरोक्त विषयाबाबत आपले वरील संदर्भांकित पत्रावरुन कळविण्यांत येते की, जून १९७६ पासून तुमचे शाळेत इंग्रजी माध्यमाची इयत्ता १ ली ते ४ थी प्रत्येकी एक तुकडी वाढविण्यास परवानगी देण्यांत येत आहे.

कळावे. दि० २१-५-७६.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

प्रत :- मा. शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे.
यांजकडे माहितीसाठी ---

Recd
24/5/76

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे म·न·पा·
जा·क्र· ६०८०
पुणे दिनांक· १६।३।९१.
२९

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,

कर्नाटक इंग्लीश स्कूल.
एरंडवणे पुणे.

यांस --

विषय - जादा वर्ग तुकडीस परवानगी मिळणेबाबत·

संदर्भ - मा·शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे जा·क्र· —
प्रा/प्राशि/जा·तु·/पी·आर·/ दि· ~~१६।३।९१~~ २१।२।९१

उपरोक्त विषयाबाबत तुमचे संदर्भांकित पत्रानुसार तुमचे शाळेस माहे ··जून····सन १९९०· पासून इयत्ता १ली. ते ४थी प्रत्येकी वी एक जादा वर्ग सुरु करणेस खालील शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे·

१· शासकिय नियमानुसार प्रशिक्षीत शिक्षक/शिक्षिका नेमण्याची व्यवस्था करावी·

२· सदर सेवकांचे वय शासन नियमानुसार असावे·

३· शासन नियमानुसार मागास वर्गीयांचे प्रमाण सदर शिक्षक नेमताना पूर्ण करावे·

४· सदर वर्गात नियमाप्रमाणे विद्यार्थी संख्या असावी·

कळावे, दि· १६।३।९१

शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ, पुणे महानगरपालिका·

एसजी·

जा.क्र.प्रा/प्रा/खाप्राशा/तु.मा./पुणे/ ९९-२०००
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक :- 5 DEC 2000

प्रति,

१] शिक्षणाधिकारी[प्राथमिक],
जिल्हा परिषद,

२] शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

३] प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,

विषय :- मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत. [माध्यम- इंग्रजी ]

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना/शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग जून, १९९९ पासून सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नांव. | माध्यम. | इयत्ता. | तुकडी वाढ. जादा/नैसर्गिक. | शेरा. मंजूर/नामंजूर. |
|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ. कलमाडी शामराव हायस्कूल, ५५/५७, डॉ. केतकर रोड, एरंडवणे, पुणे-४ | इंग्रजी | इ. १ ते ४ थी ची प्रत्येकी ४थी तुकडी. | अतिरिक्त | मंजूर |

अटी व शर्ती.

१] शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
२] सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.
३] सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५] सदर मंजूर करण्यात येणाऱ्या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६] सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या पुरेशा असणे आवश्यक आहे.
७] तपासणी अंती एक जरी अट नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करणेत येईल.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

शिक्षण मंडळ कार्यालय,पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना,
शिवाजीनगर,पुणे - ४११ ००५,
जा.क्र./खाप्राशा/ ४८५० /२०००-२००१,
पुणे,दिनांक :- १५.१२.२०००.

२१

शाळाप्रमुख,
डॉ. शामराव कलमाडी हायस्कूल
५४/५५, डॉ केतकर रोड, एरंडवणे
पुणे - ४११००४

विषय :- मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना जादा/ नैसर्गिक वाढ/नैसर्गिक वाढीच्या प्रथम/जादा तुकडया वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत [इंग्रजी माध्यम]

संदर्भ :- मा.शिक्षण उपसंचालक यांचेकडील पत्र जा.क्र./प्रा/ ९४७०९ प्राशि/खाप्राशा/तु.मा./पुवि/दि. ५.१२.२०००.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता तुमचे शाळेस खाली दर्शविण्यात आलेल्या जादा/~~नैसर्गिक वाढीचा/प्रथम~~/जादा तुकडयांचा वर्ग जून पासून सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | माध्यम | इयत्ता | तुकडीवाढ जादा/~~नैसर्गिक~~ | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | इंग्रजी | इ. १ ली ते ४ थी ची प्रत्येकी | ४ थी तुकडी | विना-अनुदान तत्वावर मंजूर |

* अटी व शर्ती :-

१] सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक,शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन दयावयास हव्यात.
२] शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.
३] शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा-शर्तींच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
४] सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

......२/-

जा. क्र. माध्य-२/शा.ना.ब./पुवि/९६/4024
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१.
दिनांक - 7 JUN 1996

प्रति,
शिक्षणाधिकारी,
[माध्यमिक विभाग],
पुणे विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे.

विषय :- शाळेच्या नावातील बदलाबाबत...
संदर्भ :- आपले कार्यालयाचे पत्र क्र. शिक्षण/माध्य/ह/९५-९६/१९५७ दिनांक नसलेले.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, कन्नड संघ पुणे संचलित कर्नाटक हायस्कूल, पुणे या माध्यमिक शाळेचे "कलमाडी शामराव हायस्कूल" असा शाळेच्या नावात बदल संस्थेच्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्रं- दि. २८.१२.९५ अन्वये बदल केला आहे.

सदर विद्यालयाच्या नविन बदलेल्या नावाची नोंद या कार्यालयाच्या दप्तरी घेण्यात येत आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे - १.

स्वाक्षांकितपर शि. उ. सं. यांची सही ठेवे

प्रत :-

१] विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
२] सचिव, कन्नड संघ, पुणे.
३] मुख्याध्यापक,
कलमाडी शामराव हायस्कूल,
५५/५७ डॉ. केतकर रोड, एरंडवणा, पुणे-४.

12/6/96

## नमुना २

**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर**
( मराठी, **इंग्रजी,** हिंदी, उर्दू,तामिळ इत्यादी माध्यम)

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ./खाप्राशा/ ७८२ /२०१७**
**पुणे १ दिनांक - / /२०१७** १६/११/२०१८

**प्रति,**

**अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,**
**कन्नड संघ संचलित डॉ. कलमाडी शामराव हायस्कूल, ५५/५७ डॉ. केतकर रोड, एरंडवणा, पुणे**

**विषय :- बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ याचा नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.**

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळांशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी याआधारे. मी **शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे** दिनांक **१ एप्रिल २०१६ पासून दिनांक ३१ मार्च २०१९** पर्यंतच्या कालावधीसाठी **इ. १ ली ते ४ थी** करिता **कन्नड संघ संचलित डॉ. कलमाडी शामराव हायस्कूल, ५५/५७ डॉ. केतकर रोड, एरंडवणा, पुणे** यांना तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन आहे. :-**

मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

१. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) शाळा पालन करील.

२. शाळांना नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.

३. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅक खाते देण्यात येईल.

४. संस्था/शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा त्याच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

५. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म,जात,किंवा वंश,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव,शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

६. **(एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

७. **(दोन)**कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

**(तीन)**कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

**(चार)**प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

**(पाच)**विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

**(सहा)** अधिनियमाच्या कलम २३(१) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

**(सात)** अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची / तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि